# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 30/03/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 03 कि.मी अंतरावर फुकट नगर शिवनगर कन्हान येथे दिनांक 29/03/2021 चे 14.30 वा. ते 15.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नंदकिशोर चेदारी सहानी, वय 19 वर्ष, रा. फुकट नगर, शिवनगर वार्ड नं. 4, कन्हान व त्याचा मित्र विशाल रामबली चव्हाण(जखमी), वय 20 वर्ष, रा. शिव नगर वार्ड 4, कांद्री कन्हान हे आपल्या राहते घरा समोर होळी सणा निमीत्त उभे होते. त्यादरम्यान आरोपी क्र. 1) फ्रॅक ॲथोनि, वय 35 वर्ष, 2) अजय चोव्हान व 3) सुरेंद्र कुलदीप सर्व रा. कांद्री कन्हान हे तेथे आले व म्हणाले की, ''यहॉ दारू कहा मिलती है, तर फिर्यादी याने म्हटले की, ''दारू कहॉ मिलती मुझे पता नही'' असे म्हटले तर आरोपी क्र. 3 याने अश्लिल शिवीगाळ देवुन म्हटले की, ''तुमको मालुम नही क्या, दारू कहॉ मिलती है'' असे म्हणुन फिर्यादी व त्याचे मित्र याला धक्का भुक्की करून मारहाण केली. यानंतर पुन्हा काही वेळाने आरोपी क्र. 1 ते 3 व 4) रॉयल चाफले, रा. कांद्री कन्हान हे तेथे आले व त्यांनी फिर्यादी व त्याचे मित्र जखमी यांचे सोबत मारहाण करून आरोपी क्र 2) याने फिर्यादीचा मित्र विशाल चव्हाण यास पोटावर चाकु मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 307, 294, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री शेख मो. क्र. 9403692766 हे करीत आहे.

### जबरी संभोग

पो.स्टे. रामटेक :– दि. 29/03/2019 चे 12.00 वा. ते 12.30 वा. सुमारास फिर्यादी यांची 7 वर्षीय मुलगी/पीडिता हीला 15 वर्षीय विधीसंघर्ष ग्रस्त बालक याने त्याच्या घरातील बकऱ्याच्या गोठयात तिला नेवुन चुंगडीवर झोपवुन पीडिते सोबत जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 376 (अ,ब) भादंवि, 4, 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि निशा भुते 9822973154 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर